## रक्तचंदन

***Pterocarpus santalinus*** Family – **Fabaceae**



**विविध भाषांमधील नावे:**

इंग्लिश: China rose, आसामी: रोकता जोबा, चायनीज: हिबिसकस, हिंदी: गुढ़ल, कोंकणी: दोस्णि फुल, मराठी: जासवंद, तामिळ: अंपुरुक्म, तेलगू: दासाना चेट्टू

**Morphology:**

*Pterocarpus santalinus* is a light demanding small tree, growing to 8 m tall with a trunk 50-150 cm diameter. Leaves are alternate 3-9 cm long, trifoliate. The flowers are produced in short raceme. The fruit is a pod,6-9 cm long with 1-2 seeds.

**वनस्पतीचे वर्णन:**

ही भारतात उगवणारी एक आयुर्वेदीक औषधी वनस्पती आहे. ही चंदनाचीच एक जात आहे. त्यास शास्त्रीय भाषेत "टेरोकार्पस सॅन्टलिनस' असे म्हणतात. अनेक लोकं याला उगाळुन याचा टिळा लावतात. रक्तचंदनाच्या लाकडापासून बाहुली बनवली जाते. हाडे किंवा सांधे दुखू लागल्यावर अथवा प्रचंड प्रमाणात मुकामार बसल्यावर ती उगाळून लावल्यास ओढ बसून वेदनेची तीव्रता कमी होते.



**बहर येण्याचा कालावधी:** फेब्रुवारी ते मार्च

**औषधी उपयोग:**

मुकामार, शरीरावरील सूज यावर उपाय म्हणून रक्तचंदन वापरतात. मुकामार लागल्यामुळे त्या जागी सूज येऊन त्वचा लाल झाली असल्यास ठणके मारतात. अशावेळी रक्तचंदन सहाणेवर पाणी घेऊन त्यावर उगाळून व त्याचा जाडसर लेप सुजेच्या जागी लावतात व तो लेप वाळल्यावर त्यावर रुग्णास सोसवेल इतक्या गरम मिठाचा शेक देतात. रक्तचंदनाचे लाकूड पूर्वापार काळापासून वापरात आले आहे. लाकूड रंगाने गडद लाल, कठीण असून ते चवीला तुरट असते. तसेच त्याला सहजासहजी वाळवी लागत नाही. लाकूड सहाणेवर उगाळून त्याचा लेप सांधेदुखी, सूज व त्वचादाह कमी करण्यासाठी लावतात. पानांचा रस कृमिनाशक व सूक्ष्मजीवरोधी आहे. जखमा स्वच्छ करण्यासाठी त्याचा वापर करतात. रक्तचंदनाच्या लाकडापासून 'सँटॅलीन' नावाचे रंगीत राळेसारखे रसायन मिळते. त्याचा उपयोग औषधांना रंग येण्यासाठी आणि लाकूड, रेशीम व चामडे रंगविण्यासाठी करतात. खोडाच्या मध्यभागातील लाकडापासून बाहुल्या, दागिन्यांच्या पेट्या, देवांच्या मूर्ती, बुद्धिबळाच्या सोंगट्या व फर्निचर अशा विविध वस्तू तयार करतात. रक्तचंदन या वृक्षाची मोठ्या प्रमाणावर तोड होत असल्यामुळे तो नष्ट होण्याच्या मार्गावर आहे. त्याच्या लाकडाची तस्करी मोठ्या प्रमाणावर होत असल्यामुळे तो तोडण्यावर बंदी घातली आहे.

**लागवड :**

मार्चमध्ये बियांसाठी फळे गोळा केली जातात आणि नर्सरीमध्ये रोपे तयार केली जातात. दोन वर्षे वयाच्या रोपांची लागवड शेतामध्ये केली जाते.